# महात्मा गांधी यांचे समाजवाद विषयक व्यवहार आणि विचार – एक राज्यशास्त्रीय अभ्यास.

**निशिकांत सावंता वाघमारे,** संशोधक विद्यार्थी - राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना-**

समकालीन व्यवस्थेमध्ये गांधीजींच्या समाजवादाकडे पाहणं आवश्यक आहे. सध्या लोकशाही व्यवस्थेची पाळीमुळे थोडी हलकी होत आहेत. त्यामुळे समाजवादी जो विचार आहे या विचारस नाकारून भांडवलवादी, साम्राज्यवादी, जातीवादी व धर्मांध शक्ती आणि स्त्री शोषणाची वाढ अधिक प्रभावी होताना दिसते. भारताने उदारमतवादी लोकशाहीचा पुरस्कार केला असला तरी देश्याच्या मूलभूत संवैधानिक मूल्यांशी विपरीत अशी वाटचाल आहे. अशा स्थितीत सध्याच्या काळात महात्मा गाधींची विचारधारा व्यवहारात आली आहे का? आणि ती कशी आणायची? हा एक प्रश्न निर्माण झाला आहे. गांधीच्या विचाराचा प्रभाव इथल्या तरुणांनवर व जनसामान्यावर कशा पद्धतीने पडत आहे. सद्यकाळात गांधींना कशा पद्धतीने समोर आणले जात आहे. आणि गांधीची खरी प्रतिमा काय आहे? ही प्रतिमा समजून घ्यायची असेल तर अशा काळामध्ये गांधींना समजून घेणे. गांधीजींचा समाजवादी विचार समजून घेणे. गांधीजींचे समाजवादाचे विचार हे त्यांनी केलेल्या लिखाणातून व व्यवहारिक पातळीवर व त्यांनी केलेल्या समाजवादाची प्रयोग या सर्व गोष्टीतून आपल्याला समजून घेणे हे मला महत्त्वाचं वाटते.

**संशोधनाची उद्दिष्टे - (Objectives)**

1) गांधीजींचे विचार व जीवनशैली समजून घेणे.

2) गांधीजींनी त्यांच्या जीवनामध्ये समाजवादी मूल्य कशी निर्माण केली आणि तिचा विचार आणि व्यवहार.

3) गांधीच्या लेखनातील समाजवादी चिंतन

**समाजवाद –**

औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले. त्यामुळे या व्यवस्थेवर टिका होऊ लागली. भांडवलशाहीमुळे कामगारांवर होणारा अन्याय दूर करणे व समाजात निर्माण झालेली आर्थिक विषमता व सामाजिक विषमता नष्ट करणे या हेतूने समाजवादाची निर्माती करण्यात आली. समाजवादी समाज कशा स्वरूपाचा असावा याबाबतीत विचारवंतामध्ये मतभेद होते. प्रत्येक देशाने आपल्या सोईप्रमाणे समाजवादाला अर्थ देण्याचा प्रयत्न केला.

समाजवाद म्हणजे ज्यात उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची असतील, आलेले उत्पादन संपूर्ण समाजाला समान वाटून दिले जाईल, समाजात कोणीही अतिश्रीमंत किंवा अतिगरीब असणार नाही. जेणेकरून समाजात वर्णद्वेष व वर्गसंघर्ष निर्माण होणार नाही. समाजवादाचा मुख्य उद्देश उत्पादनाची सर्व फळे सर्व समाजाला चाखता यावीत, जेणेकरून सर्व स्तरातील व जास्तीत जास्त लोकांचे हित साधले जाईल. या उद्देश पुर्ण करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याबाबतीत समाजवादी विचारवंतात मतभेद होते. या मतभेदातून समाजवादाचे दोन पंथ निर्माण झाले.

**1) क्रांतिवादी पंथ -**

क्रांतिवादी पंथाच्या मते, भाडवलदार हे पाषाण हृदयी आहे. त्यांना कितीही विनवण्या केल्या, अर्ज केले तरी त्यांच्यावर कोणताही परिणाम होणार नाही. भांडवलदार स्वतःचा स्वार्थ सोडून मजुरांना सवलती देतील यावर त्यांचा विश्वास नाही. तेव्हा मजुरांना सवलती प्राप्त करून घेण्यासाठी क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. क्रांतिकारी मार्गात संप, आंदोलने, घेराव, धरणे धरणे, जाळपोळ, लुटालूट इत्यादी सारख्या हिंसक मार्गाचा अवलंब करणे, त्यामुळे भांडवलदाराची कोडी होईल. व ते आपल्याला सवलती देतील. भाडवलदाराचा वर्ग अतिषय भित्रा असतो. कारण त्याच्या कारखान्याची चाबी कामगारांच्या हातात असते. त्यामुळे क्रांतिकारी मार्गचा अवलंब करून सवलती प्राप्त कराव्यात असा उद्देश या पंथाचा असतो.

**2) उत्क्रांतिवादी पंथ** – या पंथीयांच्या मते, हिंसेमुळे देशाचा विकास होण्याऐवजी विनाश अटळ आहे. क्रांतिमुळे राष्ट्रीय हित धोक्यात येते. म्हणून सनदशीर किंवा शांततेच्या मार्गाने बदल घडवून आणण्यावर यांचा भर असतो. यांच्यामते, भांडवलदार काही मनुष्यच आहे. त्यालाही मन व भावना आहेत. आज ते कितीही कठोर वाटत असले तरीही त्यांना वारंवार आपल्या परिस्थितीची जाणीव करून दिल्यास भांडवलदारांना पाझर फुटेल. ते आपल्या मागण्या मान्य करतील. असे उत्क्रांतिवादी पंथाला वाटत होते.

दोन्हीही पंथीयांची विचारसरणी मजुरांचे हित जोपासणारी होती. दोन्ही गटांना वाटत होते कामगारांच्या कामाचे तास कमी व्हावेत. कामाच्या स्वरूपात त्यांना योग्य मोबदला मिळावा. त्यांचे जीवनमान उंचवावे. आर्थिक गुलामगिरीतून कामगारांची सुटका व्हावी. इत्यादी या मजुरांच्या हितासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याबाबतीत झालेल्या मतभेदातून हे दोन पंथ निर्माण झाले. या दोन्ही पंथीयांचे ध्येय किंवा साध्य एकच होते. मात्र साधन किंवा मार्ग भिन्न होते.

**महात्मा गांधी समाजवाद -**

महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील काळ्या लोकांसाठी केलेले कार्य व त्यातून त्यांनी समतेसाठी प्रश्न उपस्थित केला. निग्रो लोकांना सुद्धा समानतेचा हक्क मिळाला पाहिजे. as a human being, as humanistic मानवतावादी दृष्टिकोनातून वर्णव्यवस्थेकडे बघितल गेले पाहिजे. मानवी जीवन व मानवी वर्तन कसे असले पाहिजे. आणि त्याचे सहसंबंध हे समतेच्या पातळीवर असले पाहिजेत. तर ते सहसंबंध हे समानतेचे नसून समतेचे असतील. समता आणि समानता याच्यामध्ये फरक आहे. equal and equality वर्णद्वेषाविरूध्द गांधीजींनी केलेले कार्य आणि तिथून त्यांना आलेले जे अनुभव होते. ते भारतातील चळवळीसाठी उपयुक्त पडले.

गांधीजींच्या एकूण जडणघडणीमध्ये मार्टिन ल्युथर किंग यांच्या विचाराचा प्रभाव पडलेला होता. त्याच्या विचारातून गांधीजींची वैचारिक जडणघडण त्या काळात झाली. आणि या विचारांचे व्यवहारात रूपांतर करायचे होते. तर त्यावेळी भारतामध्ये स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली होती. स्वातंत्र्य मिळवणं हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता. आणि हे स्वातंत्र्य लोकशाही समाजवादाकडे कसे घेऊन जाता येईल त्या दृष्टिकोनातून गांधीजींनी आपली वाटचाल पुढे चालू ठेवण्याची आपणास पहावयास मिळते.

गांधीजींनी स्वावलंबन शिकवलं, आत्मसन्मानाचं जीवन जगायला शिकवले, स्वयंभू आणि स्वयंपूर्ण होणं व स्वनिर्मित होणे या दृष्टिकोनातून गांधीजींनी त्यांच्या जीवनामध्ये व्यवहारिक पातळीवरती समाजवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केलेचे दिसून येते. याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे गांधी आश्रम होय. गांधी आश्रमा मध्ये समाजवादाची जीवनपद्धती निर्माण केल्याचे आपणास पाहावयास मिळते. ज्यामध्ये भंग्याच्या हातून भाकरी थापून घेणे व त्याच्या हस्ते भाकरी खाणे किंवा स्वतः शौचालय साफ करणे. याचे जे प्रयोग होते ते गांधीजींनी स्वतः केल्याचे आपणास दिसून येते. मग ते प्रत्यक्ष भंगी वस्तीत राहून त्यांच्यासोबत एकरूप होऊ लागले व या अत्यंत उपेक्षित व लोकांकडून तिरस्कार होणार्या दीन-दलित गरीब अशा बिचार्या अपमानित लोकांसाठी झटू लागले. आणि याचे पायंडे तयार करणे किंवा त्याला पर्यायी व्यवस्था निर्माण करणे हे काम हे गांधीजींनी त्यांच्या विचारातून व कार्यातून केल्याचे दिसून येते. असे अनेक गांधीजी छोटे-मोठे प्रयोग करायचे, ज्यामधून लोकांच्या जवळ ते जायचे. सतत कार्य करण्यामुळे गांधीजी लोकप्रिय बनत गेले आणि त्यांनी लोकांना समाजवादाचे धडे दिले.

गांधीजींनी आर्थिक, राजकीय, नैतिक, धार्मिक, शैक्षणिक या अनेक क्षेत्रातील विविध विचारधारा, प्रणाली, पद्धती व न सुटणाऱ्या समस्या यांचा समग्रपणे विचार करून त्यांचे बुद्धिनिष्ठपणे विश्लेषण केले होते. व त्याच्या तुलनेत आपला सत्य-अहिंसेचा दृष्टिकोन कसा अधिक चांगला व माणुसकीला जपणार आहे हे त्यांनी सुयोग्य व्यक्तिवाद करूनसमर्थपणे मांडले आहे. म्हणून गांधीजींच्या मतांचाही गंभीरपणे विचार करून त्यातील सत्य व मर्म शांतपणे व नि:पक्षपणे समजून घेतले पाहिजे.

भांडवलशाही, हुकुमशाही, लष्करशाही, साम्राज्यवादी व वसाहतवादी राज्यव्यवस्था या राजकारणाला त्यांनी विरोध दर्शवला. व गांधीजीनी राम राज्याची संकल्पना ही समाजवादाकडे कशी घेऊन जाते. 19 सप्टेंबर, 1929 च्या 'यंग इंडिया' मध्ये महात्मा गांधी लिहितात, 'मी रामराज्याचा अर्थ हिंदू राज्य असा समजत नाही.

रामराज्य हे देवाचे राज्य आहे, असे मी मानतो. माझ्यासाठी राम आणि रहीम हे दोन्हीही एक आणि सारखेच आहेत; सत्य आणि सद्गुणांव्यतिरिक्त मी दुसऱ्या कुठल्याही देवाला मानत नाही. माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीतलावर खरोखरच होऊन गेला का, हे मला माहिती नाही. परंतु, रामायण हे खऱ्या लोकशाहीचे असे उदाहरण आहे, जिथे लांबलचक आणि महागड्या प्रक्रियांना सामोरे न जातासुद्धा समाजातील शेवटच्या नागरिकाला न्याय मिळू शकतो. 2 ऑगस्ट, 1934 च्या 'आनंद बाजार पत्रिका' मध्ये गांधीजी लिहितात, 'माझ्या स्वप्नातील रामायणात राजपुत्र आणि रंक या दोघांनाही समान अधिकारांची खात्री दिली जाते. 2 जानेवारी, 1937 च्या 'हरिजन' मध्ये ते म्हणतात, 'राजकीय स्वातंत्र्य मिळवणे याचा अर्थ आपण ब्रिटिशांचे हाऊस ऑफ कॉमन्स, रशियन राज्यव्यवस्था, इटलीतील फॅसिस्ट अथवा जर्मनीतील नाझी शासन व्यवस्थेचे अनुकरण करावे, असा नाही. आपल्याला आपले, आपले वाटणारे (राज्य हवे) मी त्याला रामराज्य म्हणतो, म्हणजेच नागरिकांच्या नैतिकतेवर आधारलेले राज्य.' गांधीजींच्या मते, रामराज्याची राजकीय व्याख्या, 'धर्म, शांतता, सौहार्द आणि लहान-मोठे, उच्च-नीच, सर्व प्राणिमात्र आणि पृथ्वीच्यासुद्धा आनंदाचा विचार करून वैश्विक जाणिवेवर आधारलेले राज्य' अशी करता येईल.

गांधीजींना रामराज्य आणायचे होते. राम म्हणले की लोक कसे एकत्र गोळा होतात. गांधीजी लोकभावनेचा विचार करायचे, व 'हे राम' म्हणल कि लोक एकत्रित यायचे. यातूनच गांधीजींनी लोक भावनेचा विचार करून लोकांना एकत्रित आणल्याचे दिसून येते. भारतामध्ये धर्म व्यवस्था ही महत्त्वाची होती. बहुसंख्या हा हिंदू समाज होता. लोकांना एकत्र करायचं असेल तर हे राम म्हणल्या शिवाय पर्याय नाही आणि लोक भाषेमध्ये गांधीजींनी लोकांना एकत्रित केले यातूनच एक संघटन निर्माण झाले. लोक एकत्रित आल्यानंतर गांधीजी त्या लोकांना उपक्रम द्यायचे. गांधी पद्धतीने लग्न करण, गांधींच्या पद्धतीने स्वच्छता निर्माण करणे. स्वच्छता करण हे एकाच जातीचं काम असायचं मग ते गांधीजीनी नाकारलं. भंग्यानी स्वच्छता निर्माण करायची का? शुद्र लोकांनीच स्वच्छता करायची का? नाही तर आपण आपली स्वच्छता केली पाहिजे. आपण आपल्या हाताने झाडू घ्यावा व काम करावे आणि मग आपण स्वच्छता करायला लागलो की शुद्रत्वाची जाणीव नष्ट होईल. म्हणजे हे अनुभव संपन्न ज्ञान गांधीजींनी व्यवहारात आणले. यातून गांधीजींना जाती व्यवस्थेचा अनुभव आला. गांधीजींना वर्णव्यवस्थेचा अनुभव आला. गांधीजींना ब्रिटिश कायद्यांचा अनुभव आला आणि त्यातून त्यांनी नवपर्याय व्यवस्था निर्माण केली. त्यांना अपेक्षित असणारा लोकशाही समाजवाद या मधून पुढे आल्याचे आपणास पहावयास मिळते.

गांधीजींनी स्वावलंबनावर भर दिला त्यातून गरिबांना, अशिक्षितांना स्वावलंबनाचा धडा मिळाला व खादी वापरणे म्हणजे स्वदेशी माल वापरणे हे देशभक्तीचे प्रतिक बनले. खेड्यात बारा बोलतेदारीची पद्धती अनेक शेतके अस्तित्वात होती. तिचे पुनर्जीवन करण्याचा मार्ग गांधीजींनी खेडुतांना दाखविला. त्यामुळे दैनंदिन गरजा भागविणारे सुतकाम, लोहारकाम, विणकाम, नद्यात नावा चालवणे, मत्स्योद्योग, दुधाचा व्यवसाय कोंबड्या पाळून अंडी विकणे वगैरेसारखे पूर्वापार चालत आलेले उद्योग करण्यास गांधीजींनी लाखो लोकांना प्रवृत्त केले, आणि स्वाभिमानाने व प्रतीष्ठ्येने जगता येण्यासाठी स्वावलंबनाची सवय लागली. त्याचा परिणाम ब्रिटिशांच्या व्यापारावर होत गेला व खादी व्यापारारा मनुष्य ब्रिटिशांना अप्रत्यक्षपणे आपल्या शत्रू वाटू लागला. गांधीजी ही खालून म्हणजे खेड्यापाड्यातून अशा रीतीने लोकांच्या मनात ब्रिटिश सत्तेविरुद्ध वागण्याची शिक्षण देऊ लागले. लोकांना पारतंत्र्याची कल्पना देऊन देश ब्रिटिशांच्या दास्यातून मुक्त करावयाची प्रेरणा देऊ लागले. लोकांच्या मुख्यता खेड्यातील कोट्यावधी गरिबांच्या गरजा त्यांनी खेड्यात आपल्या घरी राहून, शेतीची मशागत करून स्वतःच पूर्ण करावयाचे धडे दिले व भारताच्या जुना परंपरेची पुनर्जीवन केले. त्यामुळे आपोआपच जनतेचे आवडते मनात गेले.

व्यवहारामध्ये गांधीजींनी इथली लोक भावना समजून घेणारे क्रांतिकारी होते. त्यांना बॉम्ब टाकता आला असता. त्यांना बंदूका वापरता आल्या असत्या पण त्यांनी ते केलेलं नाही तर त्यांनी लोकशाही पद्धतीने लोकांचा सहभाग घेणं आणि लोकांना कृती करायला भाग पाडणे हा गांधीजींचा मुख्य उद्देश होता. नुसते आयडालॉजी देत नव्हते तर गांधीजी लोकांवर उपक्रम ही द्यायचे. असहकार आंदोलन, दलित आंदोलन, चंपारण सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, चलेजाव आंदोलन सत्याग्रहाची जी तत्वे आहेत, ती समाजवादाशी सुसंगत आहेत आणि शांततेच्या पद्धतीने समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था टिकवून आणि समानता निर्माण करणं म्हणजे क्रांतिकारी मार्ग पेक्षा

शांततेचा मार्ग त्यांनी आधीच स्वीकारला. शांततेच्या माध्यमातून समाज परिवर्तन हे समाजवादाकडे कसं घेऊन जाता येईल असे गांधीजींचे स्वप्न होतं. हा देश समाजवादाकडे गेला पाहिजे असं गांधीजींचे धोरण होतं हाच माझा सामाजिक, आर्थिक, राजकीय समाजवाद सर्व स्तरावर कसा निर्माण करता येईल आणि इथल्या समाजाची मुक्तता कशी होईल एकूण समाज हा मुक्तिदायी जीवन पद्धतीने कसा जगता येईल या दृष्टिकोनातून गांधीजींनी हे प्रयोग केल्याचे दिसून येते.

गांधीजींचे स्त्रीमुक्तीचे कार्य असेल, अस्पृश्य निवारणाचे कार्य असेल, गांधीजींचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान असेल, या सगळ्यांमधून आपणास असं दिसून येते की गांधीजींना हा समाज शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने परिवर्तन करायचा आहे. सत्य, अहिंसा, स्वदेशी आणि शाकाहार ही गांधींच्या जीवनाची चतुसूत्री होती. त्याचा त्यांनी वापर करून समाजवादी विचाराला कशी चालना देता येईल आणि समाजवाद व्यवहारात कसा आणता येईल. या दृष्टिकोनातून त्यांनी भावनिक क्रांतिकारी आव्हान गांधीजींनी सातत्याने केलं होत. म्हणून भारत एकसंध करायचा असेल तर गांधीना सोबत घेणे गरजेचे आहे.

'भारत जोडी' हा जो नारा गांधीजीनी त्या काळात दिलेला होता. त्या पद्धतीने आज भारत जोडणं गरजेचा आहे. गांधींची भारत जोडा आणि जाती तोडो अशी भूमिका होती ती आज पुढे येणं गरजेचं आहे. आणि तरच समाजवादी राजकारण निर्माण होईल. कारण गांधीजी हे समाजवादी राजकारणाचे डावपेच करायचे आणि ते इथल्या सर्व घटकांना एकत्रित करून सर्व वर्गांना एकत्रित आणायचे. आणि त्यांनी वर्गसंघर्ष न स्वीकारता नववर्गाचा कुठेही वापर न करता गांधीजींना समाजामध्ये समाजवादी क्रांती निर्माण करायची होती. कार्ल मार्क्स हा वर्गयुद्ध/वर्गीय समाज निर्माण करतो. जे दोन वर्गातले भांडण आहे. श्रीमंत व गरीब आणि मग त्यांच्यामध्ये आहे रे वर्ग व नाही रे वर्ग. पण गांधीजी हे समाजवादाच्या नावाखाली प्रत्येक घटकांना एकत्रित करतात. ते परस्परांमध्ये भांडण न करता त्यांनी सामोपचाराचा राजकारण त्यांनी त्या ठिकाणी केल्याचे बघायला मिळते. त्यांनी भांडवलवादाला विरोध केला त्यांनी चरख्याचा वापर करून लोकांना स्वावलंबी बनवण्याचं काम केल्याचे दिसते. प्रत्येक व्यक्तीने सूतकातलं तर तुम्ही स्वावलंबी व्हाल व इथलं जे भांडवल इथच उभा करू शका. यातून स्वदेशी वस्तूचा वापर करून तो समाजवादाकडे घेऊन जाण्याचा दृष्टिकोन गांधीचा दिसून येतो.

**निष्कर्ष -**

गांधीच्या विचारातून खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाची व विकासाची खरी विचारसरणी आहे म्हणून तिचा अंगीकार इथल्या लोकशाही शासन व्यवस्थेने करणं गरजेचा आहे आणि तो जनसामान्यांच्या मध्ये रुजवणे गरजेचा आहे. गांधीजींची तत्त्वज्ञान सध्यकाळामध्ये सुद्धा लागू पडते हे त्यांच्या समाजवादी विचारतून स्पष्ट होते.

**संदर्भसूची** -

1) हिंद स्वराज्य : समाजसापेक्ष विकासाच्या प्रतिमानाचा आराखडा- चौत्रा रेडकर

2) सत्याग्रह समाजवाद : गांधी आणि कार्ल मार्क्स यांचे परस्पर प्रकाशातील पुनर्वाचन - राजेश्वरी देशपांडे

गांधी : जीवन व कार्य - किशोर बेडकिहाळ.गांधीविचार आणि समकालीन विचारविश्व - अशोक चौसाळकर

प्रकाशन – साधना प्रकाशन

3) हिंद स्वराज्य- मोहनदास करमचंद गांधी : अनुवाद- रामदास भटकळ प्रकाशन-, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

4) महात्मा गांधी विचारविमर्श - डॉ.ग.ना.जोशी. प्रकाशन- मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,

5) राजकीय विचार प्रणाली – डॉ.सौ.शुभांगी राठीप्रकाशन कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद